# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

जा.क्र. ७४१/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०४/११/२०१७

## १) तपासा दरम्यान आरोपींनी गुन्हा केल्याचे कबुली निवेदन दिल्याने गुन्हा नोंद. :–

दिनांक ३/११/२०१७ चे ४ वर्षा पुर्वी यातील तिन्ही आरोपीतांनी संगनमत करून मृतक सुनिल किसन चिंधालोरे वय अंदाजे ३५ वर्ष रा. हनुमाण नगर तुमसर याने आरोपी क्र. ३ यास दारूच्या अड्डयाची महीन्याला '' देण '' मागीतली असता चिडुन तिन्ही आरोपीतांनी मृतकास दगडाने डोक्यावर मारून त्याचा खुन केला व पुरावा नष्ट करण्याचे उद्देशाने त्याचे मृत शरीरावर पेट्रोल टाकुण जाळले होते. असे आरोपी क्र. १ ने पो.स्टे. तुमसर अप क्र. ०३६५/१७ क.३९९,४०२ भा.दं.वि. सहकलम ३,२५ भा.ह.का. चे तपासा दरम्यान कबुली निवेदन दिल्याने व पो.स्टे. आंधळगाव येथे कलम ३०२,२०१,३४ भा.दं.वि. प्रमाणे गुन्हा नोंद करण्या संबधी पो.स्टे. तुमसर येथे प्राप्त झालेल्या कागदपत्रावरून पोलीस स्टेशन आंधळगाव येथे कलम ३०२,२०१,३४ भा.दं.वी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पो.नि. गुरूनुले पो.स्टे. आंधळगाव हे करीत आहेत. ( मध्यवर्ती कारागृह भंडारा येथे अभीरक्षेत आहेत)

## २) जुण्या वादावरून अश्लिल शब्दात शिवीगाळ करून जिवाने मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद . :–

दिनांक ०२/१०/२०१७ चे १८.३० वाजता. दरम्यान यातील आरोपीने जुण्या वादा वरून फिर्यादीस रस्त्यात अडवुण अश्लिल शब्दात शिवीगाळ करून ढकलढुकल केले व जिवाने मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादी जितेन्द्र सहादेव पटले वय ३० वर्ष रा. डोंगरला फिर्यादी जितेन्द्र सहादेव पटले वय ३० वर्ष रा डोंगरला यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ३४१,२९४,५०६ भा.दं.वी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पो.हवा. कंळबे पो.स्टे. तुमसर हे करीत आहेत.

## ३) अज्ञात मोटार सायकल धडकेत गंभिर जखमी होवुन उपचारा दरम्यान इसमाचा मृत्यु ..:–

**अ)** दिनांक १२/११/२०१७ चे १९.०० वाजता. दरम्यान यातील मृतक राजकुमार तेजुलाल हणुवते वय ४२ वर्ष रा. तुडमापुरी हा त्याचे ताब्यातील मोटार सायकल क्र. एमएच ३५ एच २२८८ ने गावाकडे जात असतांना यातील अज्ञात आरोपी मोटार सायकलने त्याचे ताब्यातील मोटार सायकल ही भरधाव वेगाने, निष्काळजीपणे चालवुन मृतकचे मोटार सायकलला धडक दिल्याने त्याचे डोक्याला, उजवे पायाला गंभिर मार लागुन जखमी झाल्याने त्यास औषधोपचारा करीता मेडीकल कॉलेज नागपुर येथे भरती असतांना उपचारा दरम्यान दिनांक १६/१०/२०१७ चे १७.३५ वा. मरण पावल्याने पो.स्टे अजनी नागपुर येथे मर्ग क्र. ००/१७ कलम १७४ जाफौ. चे कागदपत्र टपाला व्दारे प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी मपोना निखाडे यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम २७९,३०४(अ) भा.दं.वी. सहकलम १८४ मोवाका. अन्वये नंबरी गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. निंबेकर पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

**ब)** दिनांक १८/१०/२०१७ चे ११.०० वाजता. दरम्यान यातील मृतक विष्णु चैतराम जनबंधु वय ४७ वर्ष रा. सेंदुरवाफा हा त्याचे मित्राचे मोटार सायकलवर मागे बसुन सेंदुरवाफा कडे जात असतांना समोरून येणा–या यातील अज्ञात आरोपी मोटार सायकलवर चालकाने त्याचे ताब्यातील मोटार सायकलवर हयगयीने,लापरवाहीने चालवुन मृतक बसलेल्या मोटार सायकलवर धडक देवुन त्याचे डोक्याला गंभिर मार लागल्याने त्यास औषधोपचारा करीता मेडीकल कॉलेज नागपुर येथे भरती केले असता उपचारा दरम्यान दि. १८/१०/२०१७ चे २३.०० वा मरण पावल्याने पो.स्टे. अजनी नागपुर येथे मर्ग क्र. ००/१७ क. १७४

यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. ला साकोली कलम २७९,३०४(अ) भा.दं.वी. सहकलम १८४ मोवाका. अन्वये नंबरी गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. रेवतकर पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

**५) जळाल्याने उपचारा दरम्यान महिलेचा मृत्यु . :–**

दिनांक ३/११/२०१७ चे ११.०० वाजता. दरम्यान यातील मृतक सौ. कुंदा फुलदास मेश्राम वय २८ वर्ष, रा. सालई ही दि. ०२/११/२०१७ ला ९५ टक्के जळाल्याने तीला औषधोपचारा करीता सा. रू.भंडारा येथे २०.३० वाजता भरती केले असता उपचारा दरम्यान दि. ०३/११/२०१७ चे ११.०० वा मरण पावल्याने डॉ. मेमो वरून पो.स्टे. भंडारा येथे मर्ग क्र. ००/१७ क्र. १७४ जाफौ चे कागदपत्र प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पो. शि. झलके यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. साकोली येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सपोनी. वर्मा पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

**६) अल्पवयीन मुलीस लावुन पळवुन नेल्याने गुन्हा नोंद .:–**

दिनांक ३/११/२०१७ चे १७.०० वाजता. दरम्यान यातील फिर्यादी ही घरी झोपली असतांनी अंदाजे १४.०० वा दर. झोपुन उठली असता फिर्यादीची अल्पवयीन मुलगी ही घरी दिसुन न आल्याने फिर्यादीने मैत्रीनी कडे. व आजुबाजुला शोध घेतला असता मिळुन न आल्याने व यातील संशयीत आरोपी याने फिर्यादीचे मुलास जिवे मारण्याची धमकी दिल्याने तसेच फिर्यादीचे मुलीला फुस लावुन पळवुन नेल्याचा संशय असल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम ३६३,५०६ भा.दं.वी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. आत्राम पो.स्टे. जवाहरनगर हे करीत आहेत.

**७) दारुचे नशेत वाहन चालवितांनी मिळुन आल्याने गुन्हा नोंद .:–**

दिनांक ३/११/२०१७ चे ०२.०० वाजता दरम्यान यातील आरोपीने आपले ताब्यातील मोटार सायकल ही दारू पिऊन दारूचे नशेत चालवितांनी रात्री पेट्रोलींग दरम्यान मिळुन आल्याने त्याचे सा.रू.भंडारा येथे वैद्यकीय परिक्षण केले असता डॉ. ने तपासुन तो दारूचे नशेत असल्याचे अभिप्राय दिल्याने सरतर्फे फिर्यादी पोना. गजभिये पो.स्टे. भंडारा येथे कलम १८५↕(१) भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. साबळे पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**८) चुलबंद नदीचे पात्रातील पाण्यावर मृत अवस्थेत इसमाचे प्रेत तरगंतांनी मिळुन आल्याने मर्ग नोंद .:–**

दिनांक ३/११/२०१७ चे ०९.०० वाजता दरम्यान यातील मृतक दाजीबा नागो अंबादे वय ६५ वर्ष, रा. मांढळ हा दिनांक ०२/११/२०१७ चे १४०० वा पासुन घरी कोणाला काही न सांगता घरून निघुन गेला होता व मृतकचे प्रेत चुलबंद नदीचे पात्रातील पाण्यावर मृत अवस्थेत तरगंतानी मिळुन आल्याने फिर्यादी मनोज दाजीबा अंबादे वय २८ वर्ष, रा. मांढळ यांचे तोंडी रिपोर्ट वरून पो.स्टे. लाखांदुर येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पो.हवा. खंडाते पो.स्टे. लाखांदुर हे करीत आहेत.

**९) अवैध दारू /जुगार अंडयावर धाडी . :–**

दिनांक ३/११/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन भंडारा, जवाहरनगर, मोहाडी, कारधा, तुमसर, सिहोरा, साकोली, लाखणी व पवनी येथे अवैध दारू/जुगार अंडयावर धाडी घालुन एकुण १७ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन १३४ लिटर हातभट्टी दारू+१२०किलो सडवा मोहा+ साहित्य किंमती १६२३०/–रु. १६ लिटर ३८०मिली लिटर देशी दारु किंमती ४९७०/–रु. चा माल तसेच जुगारातुन कि. २२९०/– रु. असा एकुण २३,४९०/– रु. चा माल जप्त करण्यात आला.

१०) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :—

दिनांक ३/११/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ११५ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवाशी ०३ तीन सिटर वाहनांवरती ११ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती १०१ केसेस करण्यात आले आहे.

(मपोउपनी. माया चाटसे)
माहिती कक्ष भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९२१७४१६८१

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.